| | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.९८/२०२३ मधील नि.क्र.१७ वरील आदेश</u>**<br>श्री. पांडुरंग नागोजी घोळसे, वगैरे.<br>**वि.**<br>श्री. धाकलु सुबराव वाटील–मयत तर्फे वारस. |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी विरूद्ध हक्कज्ञापनासाठी व कायम मनाई करीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.१७ वरील अर्जाद्वारे त्यांच्याविरुध्द आपोआप नियमानुसार पारीत झालेला 'विना बचावपत्र' चा आदेश रद्द करुन त्यांचे अर्जासोबत दाखल केलेले बचावपत्र अभिलेखावर घेण्यासाठी विनंती केली आहे. अर्जात प्रतिवादी कथन करतात की, दाव्याची जुनी कागदपत्रे त्यांना वेळेत मिळाली नसल्याने त्यांना त्यांचे विधिज्ञांना भेटून मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सदर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ झाला नाही तर त्यास त्याच्या कायदेशीर हक्कापासून वंचित राहावे लागणार असून त्याचे आतोनात असे नुकसान होणार असून त्यास न्यायापासून वंचित राहावे लागणार आहे. म्हणून त्यांनी न्यायाखातीर विना बचावपत्राचा आदेश रद्द करून त्यांचा सदरचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे. अर्जासोबत प्रतिवादी क्र.१ यांनी शपथपत्र सादर केले आहे. प्रतिवादी यांना संधी देऊनही त्यांनी म्हणणे सादर केले नसल्याने अर्ज विना म्हणणे आदेशाकामी घेण्यात आलेला आहे.

२. वादीने सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार, बचावाची संधी ही या तत्वाचा मूल आधार आहे. त्यामुळे बचावाची संधी नाकारणे सुध्दा न्यायसंगत होणार नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे '***<u>संदिप थापर वि. एस.एम.इ. टेक्नॉलॉजीस, एआयआर २०१४ सर्वोच्च न्यायालय ८९७</u>***' मधील न्यायनिर्णयात उध्दृत केल्यानुसार बचावपत्र दाखल करण्यास केवळ ३० दिवसांचा अवधी कायदयाने मान्य आहे व त्यापुढील ६० दिवसाचा वाढीव अवधी हा केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये मान्य करता येईल. या वाढीव अवधीचा उद्देश हा एखादया पक्षावर होणारा अन्याय होऊ न देणे हाच आहे. तथापि, सहजपणे अशा प्रकारचा अर्ज व अशा प्रकारची विनंती मान्य करता येणार नाही हा सुध्दा प्रस्थापित विधिसिध्दांत आहे. प्रकरणाचे अभिलेख पाहता, प्रतिवादी क्र.१ हे प्रकरणामध्ये स्वत: दि.११/१०/२०२३ रोजी हजर झालेले आहेत. तेव्हापासून त्यांनी मुदतीत त्यांचे बचावपत्र

दाखल करणे आवश्यक होते. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि.०४/०३/२०२४ रोजी दाखल केला आहे. यावरून प्रतिवादींना बचावपत्र दाखल करण्यास मुदतीपेक्षा जवळपास दिड महिन्यापेक्षा जास्त विलंब झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. तथापि, बचावाची संधी ही नैसर्गिक न्यायतत्वाचा महत्वाचा भाग आहे. अर्जदार प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेल्या कारणांचा विचार करून झालेल्या विलंबाबाबत व त्यामुळे झालेल्या प्रतिपक्षाच्या नुकसानीबाबत सुध्दा विचार होणे न्यायाचे संतुलन राखण्यासाठी आवश्यक बनते. या सर्व बाबींचा साकल्ल्याने विचार करुन अर्जदार प्रतिवादी विरुध्द खर्चाच्या रकमेचा आदेश करुन त्यांचे बचावपत्र अभिलेखावर घेण्यासाठी पात्र आहे. सबब, पुढील आदेश.

**<u>आ दे श</u>**

प्रतिवादी क्र.१ यांचा नि.क्र.१७ वरील अर्ज रक्कम रू.३००/- वादी यांना एकत्रित देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.१८ वर दाखल केलेले बचावपत्र अभिलेखावर पुढील शर्ती व अटींना अधीन राहून नोंदविण्यात येत आहे.

प्रतिवादी क्र.१ यांच्याविरुध्द नियमानुसार आपोआप पारीत झालेला 'विना बचावपत्र' चा आदेश त्यांनी पुढील पुर्तता केल्यानंतर रद्द ठरेल.

प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाच्या रकमेची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास सदर आदेशाचा अंमल संपुष्टात येईल याची अर्जदार प्रतिवादी क्र.१ यांनी व वादीने नोंद घ्यावी.

DISTRICT COURT, MAHARASHTRA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2024.05.06 15:07:00 +0530

**दि. ०६/०५/२०२३.** **(चारूदत्त उद्धव शिपकुले)**
**चंदगड** **दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, चंदगड**